Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. २७ मे २०२६ । वर्ष १ । अंक ५२ । पाने २ ।

DIGITAL EDITION

वर्टेक्स हिलिंग सेंटरतर्फे पदवीदान सोहळा संपन्न!

(पान २ वर)



Selected

### चाऱ्यासाठी सरकारी जमिनीवर गवत लागवड!

मुंबई : गाव, महानगरांसह जंगलांना लागून असलेल्या सरकारच्या सर्व पडीक व महसुली जमिनींवर आता मोठ्या प्रमाणावर 'नेपियर ग्रास' आणि बांबूची लागवड करण्यात येणार आहे. ही जमीन स्थानिक महिला बचत गट, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) तसेच सुशिक्षित बेरोजगारांच्या संस्थांना तीन वर्षांच्या भाडेपट्ट्यावर दिली जाणार आहे. राज्यातील चारा टंचाईच्या समस्या तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी उपाययोजना करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार हा निर्णय घेतल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. बैठकीला अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल आणि मंत्रालयातील विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते. कोणत्याही भूधारकाला आपली खासगी जमीन विनाकारण पडीक किंवा रिकामी ठेवता येणार नाही. तिचा योग्य शेती किंवा चारा उत्पादनासाठी वापर करणे बंधनकारक असेल.

## इंधनाच्या कृत्रिम टंचाईवरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा, गृह विभागाला आदेश

# साठेबाजांवर होणार कठोर कारवाई!

### विदर्भ आणि मराठवाड्यात इंधनाची टंचाई; पेट्रोलपंपांवर शेतकऱ्यांच्या रांगा

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई। राज्यात पेट्रोलबाबत सरासरी मागणीपेक्षा २३ टक्क्यांनी मागणी वाढली आहे. डिझेलच्या मागणीत तर तब्बल ५२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अकोला येथे तर १५४ टक्क्यांपेक्षा जास्त पुरवठा होत आहे. तरीही टंचाईसदृश स्थिती तयार होत आहे. :त्यामुळे इंधनाची साठेबाजी होत असल्याचा दाट संशय असून साठेबाजांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पुरवठा तसेच गृह विभागाला दिले आहेत.**

विदर्भ आणि मराठवाड्यात इंधनाची टंचाई असून पेट्रोलपंपांवर शेतकऱ्यांच्या रांगा लागल्याचे चित्र सातत्याने पुढे येत आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर बोलताना मुख्यमंत्र्यांनी इंधनाची कृत्रिम टंचाई खपवून घेतली जाणार नसल्याचे सांगतानाच साठेबाजांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला. 'सरासरीपेक्षा पेट्रोल आणि डिझेलची मागणी वाढली आहे. मात्र, या मागणीची पूर्तता केली जात आहे. पेट्रोलच्या मागणीत २३ टक्क्यांनी तर डिझेलच्या मागणीत ५२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अकोल्यात १५४ टक्क्यांहून जास्त





पुरवठा होत आहे. शेतकऱ्यांना डिझेल मिळावे यासाठी प्रयत्न करत आहोत. त्याचा गैरफायदा काही लोक घेत आहेत. कांद्याच्या दरावरून काही लोक विनाकारण राजकारण करत असल्याचा टोला मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना लगावला. 'कांदा कापल्यानंतरही ज्यांच्या डोळयात अश्रू येणार नाहीत. अशी मंडळी आता अश्रू ढाळण्याचा प्रयत्न करत आहेत. पण महायुतीचे सरकार कांद्याबाबत संवेदनशीलतेने काम करत आहे. विरोधकांची केवळ 'फोटो अपॉच्र्युनिटी' सुरू आहे', असे मुख्यमंत्री म्हणाले. प्रणिती शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेल्या टीकेबाबत विचारले असता, 'प्रणिती शिंदे या पहिल्यांदाच खासदार झाल्या आहेत. त्यांनी अधिक जबाबदारीने बोलले पाहिजे आपण कोणाबद्द बोलत आहोत, काय बोलत आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले. कांदाप्रश्नी सरकार संवेदनशील कांद्याच्या दराबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारने कांद्याच्या खरेदीचा भाव साडेतीन रुपयांनी वाढवून १५ रुपये केल्याचे सांगितले. दरनिश्चितीबाबत केंद्र सरकारला विनंती केली असून बुधवारी केंद्र सरकारसोबत बैठक होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेतकऱ्यांबाबत राज्य सरकार संवेदनशील असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

#### शेतकरी आणि सर्वसामान्य वाहनधारक त्रस्त

जळगावात इंधनाचा तुटवडा नाही, तर साठेबाजी! गेल्या काही दिवसांपासून जळगाव जिल्ह्यात निर्माण झालेली इंधनाची टंचाई ही वास्तविक नसून ती अफवा आणि मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या साठेबाजीमुळे निर्माण झाल्याचे आता उघड झाले आहे. राज्य शासनाने जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, जळगाव जिल्ह्यात सरासरीच्या तुलनेत डिझेल आणि पेट्रोलच्या विक्रीत अभूतपूर्व वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर, जळगाव जिल्ह्यातील साठेबाजांवर आता पोलीस आणि पुरवठा विभाग संयुक्तपणे कडक कारवाई करणार असल्याची माहिती समोर आली आहे. २३ मे रोजी संपलेल्या कालावधीच्या आकडेवारीनुसार, जळगाव जिल्ह्यात नियमित साठ्यापेक्षा तब्बल ८५ टक्के अतिरिक्त डिझेल विकले गेले आहे. तर दुसरीकडे, पेट्रोलच्या मागणीतही मोठी वाढ झाली असून, जळगावात सरासरीपेक्षा ४० ते ५३ टक्क्यांपर्यंत अधिक पेट्रोलची विक्री झाली आहे. इंधनाच्या या कृत्रिम टंचाईमुळे जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकरी आणि सर्वसामान्य वाहनधारक कमालीचे त्रस्त झाले आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## संत शिरोमणी भीमा भोई जयंती उत्साहात साजरी

### अभिवादन आणि महाप्रसाद वितरण



**जन सम्राट टाईम्स**

**पाळधी बुद्रुक | प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील पाळधी येथे श्री संत शिरोमणी भीमा भोई जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त भोई समाज युवा मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री संत भीमा भोई यांच्या प्रतिमेचे पूजन जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमांनाही पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव गुलाबराव पाटील, शेतकी संघाचे संजय महाजन, अहमद शेठ, मज्जित शेठ, गोपाल सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांचे भोई समाज युवा मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात समाजबांधवांसह महिला भगिनींचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. प्रतिमापूजन आणि अभिवादनानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ललित मोरे, महेश मोरे, विठ्ठल भोई, सुरेश मोरे, कांतीलाल भोई, रमेश भोई, काशिनाथ भोई, नरेश भोई, तेजस भोई, मनोज भोई, वैभव भोई, योगेश भोई, विनोद भोई, गणेश भोई, जयवंत पवार, आरुष मोरे, क्रांती सोनवणे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## वीरपत्नी ज्योत्स्ना अहिरे यांना 'सैनिक रत्न' पुरस्कार जाहीर!

### प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उभा केला प्रेरणादायी संघर्ष; जळगावच्या रणरागिणीचा सन्मान

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव| प्रतिनिधी:** सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित 'सैनिक रत्न' पुरस्कार वीरपत्नी श्रीमती ज्योत्स्ना अशोक अहिरे यांना जाहीर करण्यात आला आहे. पतीच्या निधनानंतर आलेल्या कठीण परिस्थितीतही न खचता जिद्द, संघर्ष आणि कर्तृत्वाच्या बळावर उभे राहून त्यांनी समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. ज्योत्स्ना अहिरे यांचे पती वीर जवान अशोक शंकर अहिरे हे अवघ्या १८ व्या वर्षी भारतीय सैन्यातील २ महार रेजिमेंटमध्ये भरती झाले होते. त्यांनी लेह-लडाख, जम्मू-काश्मीर आणि राजस्थानसारख्या अत्यंत प्रतिकूल व संवेदनशील सीमाभागात देशसेवा बजावली. मात्र, प्रकृती खालावल्याने १६ मार्च २०१६ रोजी पुणे येथील कमांड हॉस्पिटलमध्ये त्यांचे निधन झाले. पतीच्या निधनावेळी ज्योत्स्ना ताई केवळ २८ वर्षांच्या होत्या. पदरात मुलगी मेघा आणि मुलगा प्रणव अशी दोन लहान मुले असताना त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. मात्र, या संकटातही त्यांनी हार मानली नाही. शिक्षण



अपूर्ण असतानाही त्यांनी पुन्हा अभ्यास सुरू करत B.A., MS-CIT आणि टायपिंगचे शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या संघर्षाचे फळ आज त्यांच्या मुलांच्या यशातून दिसून येत आहे. मुलगी मेघा १२ वी विज्ञान शाखेत उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झाली असून सध्या NEET आणि CET परीक्षांची तयारी करत आहे. तर मुलगा प्रणव वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत देशसेवेचे स्वप्न पाहत आहे. सध्या ज्योत्स्ना अहिरे या जळगाव MIDC मधील BPCL प्लांटमध्ये कार्यरत असून नोकरीसह घराची जबाबदारी समर्थपणे सांभाळत आहेत. त्याचबरोबर त्या सैनिक फेडरेशनच्या पदाधिकारी म्हणून तसेच विविध सामाजिक संघटनांमधून सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या धैर्य, त्याग आणि जिद्दीच्या प्रवासाचा गौरव करत सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्याने त्यांना 'सैनिक रत्न' पुरस्कार जाहीर केला आहे.

## अभिमानाची गोष्ट! अहिराणी भाषेला युनेस्कोचा 'इंडो-आर्यन' दर्जा

### 'पहिले विश्व अहिराणी संमेलन' युनोपर्यंत; भाषेला प्रमाण दर्जासाठीच्या लढ्याला यश

**जन सम्राट टाईम्स**

**जळगांव| प्रतिनिधी :** खानदेशातील अहिराणी भाषेला प्रमाण भाषेचा दर्जा मिळावा यासाठी उत्तर महाराष्ट्र खानदेश विकास मंडळ आणि अहिराणी साहित्यिकांकडून सुरू असलेल्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या (UNO) युनेस्को (UNESCO) संस्थेने अहिराणी भाषेची अधिकृत दखल घेत गौरवपत्र पाठविल्याची माहिती उत्तर महाराष्ट्र खानदेश विकास मंडळाचे अध्यक्ष विकास पाटील यांनी दिली. जगातील विविध भाषा, बोलीभाषा आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी कार्य करणाऱ्या युनेस्को संस्थेने अहिराणी भाषेच्या संवर्धनाच्या उपक्रमांची नोंद घेतल्याने खानदेशातील साहित्यिक, अभ्यासक आणि भाषाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

अहिराणी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी सुरू असलेल्या चळवळीला या घटनेमुळे मोठे पाठबळ मिळाल्याचे मानले जात आहे. केंद्र सरकारच्या भारतीय बोलीभाषा संवर्धन कार्यालयाचे मुख्यालय बंगलोर येथे असून, त्या कार्यालयातील अधिकारी श्रीमती काटजू यांनी 'पहिले विश्व अहिराणी संमेलन' याची विशेष दखल घेतली होती. शासकीय स्तरावर अहिराणी भाषा आणि तिच्या कार्यक्रमांची झालेली ही पहिली अधिकृत नोंद असल्याचे सांगितले जात आहे. पहिल्या विश्व अहिराणी संमेलनातील विविध कार्यक्रमांच्या व्हिडिओ क्लिप्स आणि अहिराणी भाषेविषयीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली होती.

त्यानंतर ही माहिती युनेस्कोकडे पाठविण्यात आली. युनेस्कोकडून प्राप्त झालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे अहिराणी भाषेच्या संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संघटनांचा उत्साह वाढला आहे.

अहिराणीला व्यापक ओळख मिळण्याचा मार्ग सुकर अहिराणी ही खानदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा आणि साहित्याशी घट्ट जोडलेली भाषा असून, तिला स्वतंत्र प्रमाण भाषेचा दर्जा मिळावा यासाठी अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. युनेस्कोच्या स्तरावर या भाषेची दखल घेतली गेल्याने भविष्यात अहिराणीला व्यापक ओळख मिळण्याचा मार्ग अधिक सुकर होणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## एरंडोल तालुक्यातील पशुवैद्यकीय सेवा कोलमडली!

### रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील पशुपालक त्रस्त

**जन सम्राट टाईम्स**

**एरंडोल | प्रतिनिधी :** एरंडोल तालुक्यात पशुवैद्यकीय विभागातील महत्त्वाची पदे दीर्घकाळापासून रिक्त असल्याने ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवा पूर्णपणे कोलमडल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. पशुवैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे आजारी जनावरांना वेळेवर उपचार मिळत नसून पशुपालकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये पशुवैद्यकीय दवाखाने नियमित सुरू नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. उपलब्ध कर्मचारी अतिरिक्त जबाबदाऱ्या सांभाळत असल्यामुळे ग्रामीण भागात सेवा पोहोचवण्यात अडचणी निर्माण होत आहेत. काही ठिकाणी एका दवाखान्यावर तब्बल दहा ते पंधरा गावे जोडण्यात आल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. विशेष म्हणजे, काही ठिकाणी नियुक्त करण्यात आलेले अतिरिक्त पशुवैद्यकीय अधिकारीदेखील गावात फिरकत नसल्याचा आरोप पशुपालकांकडून केला जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवा "अखेरची घटका मोजत आहे का?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते. मात्र, वेळेवर उपचार न मिळाल्याने जनावरांचे मृत्यू, रोगराई आणि उत्पादनात घट होत असल्याचे चित्र आहे. लसीकरण मोहिमा, रोगनियंत्रण तसेच कृत्रिम रेतन सेवांवरही या परिस्थितीचा विपरीत परिणाम होत आहे. रिंगणगाव दवाखान्यावर १५ गावांचा भार रिंगणगाव पशुवैद्यकीय दवाखान्याअंतर्गत तब्बल १५ गावे जोडण्यात आली आहेत.



या सर्व गावांसाठी केवळ एक अतिरिक्त पशुवैद्यकीय अधिकारी नेमण्यात आला आहे. मात्र संबंधित अधिकारीही नियमितपणे ग्रामीण भागात उपलब्ध राहत नसल्याने पशुपालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. परिणामी पशुधनाचे आरोग्य धोक्यात आले असून पशुपालकांचे आर्थिक नुकसान वाढत आहे.

#### प्रशासनाकडून उपाययोजनांची मागणी

"माझ्या १५ शेळ्या दगावल्या" पशुपालक शरद धनगर यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, "मी बँकेचे कर्ज काढून शेळीपालन व्यवसाय सुरू केला होता. काही दिवस सर्व काही सुरळीत होते. मात्र शेळ्यांना आजार झाल्यानंतर मी रिंगणगाव येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना अनेकदा फोन केला. पण कोणीही गावात आले नाही किंवा औषध उपलब्ध करून दिले नाही. उपचाराअभावी माझ्या दहा ते पंधरा शेळ्या दगावल्या. यात माझे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून आता बँकेचे कर्ज कसे फेडावे, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे." पशुवैद्यकीय विभागातील रिक्त पदे तातडीने भरावीत, अतिरिक्त डॉक्टरांची नियुक्ती करावी आणि ग्रामीण भागात नियमित सेवा देण्यासाठी अधिकाऱ्यांना सक्त सूचना द्याव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापनासाठी जळगाव प्रशासन सज्ज

### मेहरूण तलावावर अग्निशमन दलाची शोध व बचाव प्रात्यक्षिके

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** येत्या मान्सून काळात उद्भवणाऱ्या संभाव्य पूरस्थिती, बुडण्याच्या दुर्घटना तसेच विविध आपत्कालीन घटनांचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी जळगाव जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली आहे. जिल्हाधिकारी रोहन घुगे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी मेहरूण तलाव परिसरात विशेष शोध व बचाव प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विविध विभागांच्या आपत्कालीन यंत्रणांची सज्जता आणि समन्वय क्षमता तपासण्यात आली. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस दल, जळगाव महानगरपालिका अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग तसेच महावितरण यांच्या संयुक्त विद्यमाने मेहरूण तलावावरील गणेश घाट येथे सायंकाळी पाच वाजता हे प्रात्यक्षिक पार पडले. पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पूरस्थिती, पाण्यात अडकलेल्या नागरिकांची सुटका, विजेच्या दुर्घटना आणि अन्य नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर या प्रात्यक्षिकांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. या सरावादरम्यान अग्निशमन दलाच्या जवानांनी आधुनिक शोध व बचाव उपकरणांचा वापर करून प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर केली. बोटींच्या सहाय्याने पाण्यात अडकलेल्या व्यक्तींना सुरक्षित बाहेर काढणे, आपत्कालीन परिस्थितीत जलद



प्रतिसाद देणे, बचाव पथकांमध्ये समन्वय राखणे तसेच दुर्घटनास्थळी तातडीची मदत पोहोचविण्याचे विविध प्रकार सादर करण्यात आले. यामुळे आपत्कालीन प्रसंगी विविध यंत्रणा कितपत तत्परतेने काम करू शकतात, याची चाचणी घेण्यात आली. मुख्य अग्निशमन अधिकारी अश्वजीत घरडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाचे नरवीर रावळ, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस अधीक्षक बबन आव्हाड तसेच केंद्र अग्निशमन अधिकारी भारत बारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सराव यशस्वीपणे पार पडला. यावेळी अग्निशमन दलाचे वाहन चालक प्रकाश चव्हाण, देविदास सुरवाडे, यश अहिरे, अजय पाटील, दीपक चौधरी, १०८ ॲम्बुलन्स चालक संदीप गवले, डॉ. मोईन शेख, महावितरणचे कार्यकारी अभियंता साळी साहेब, हर्षल नेते, फायरमन योगेश कोल्हे, संजय तायडे, भूषण पाटील, नितीन ससाने, जगदीश साळुंखे, किरण पाटील, राकेश सोनवणे आणि विकी सोनवणे यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. महाराष्ट्र शासनाकडून जिल्ह्यातील १५ पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या ८७ पोलीस चौक्यांना वितरित करण्यात आलेल्या आपत्कालीन बचाव साहित्य किटबाबतही उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. या किटमध्ये पूरस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात आवश्यक असणारी विविध सुरक्षा साधने उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली.

#### प्रशासन अधिक सक्षम आणि सज्ज

यावेळी महावितरणच्या आपत्कालीन पथकाने विजेच्या तारांजवळ धोकादायक ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या सुरक्षिततरीत्या कशा कापल्या जातात, याचेही प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होणे किंवा शॉर्टसर्किटच्या घटना टाळण्यासाठी अशा उपाययोजनांची आवश्यकता असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मान्सूनपूर्व आयोजित करण्यात आलेल्या या संयुक्त सरावामुळे आपत्कालीन परिस्थितीत प्रशासन अधिक सक्षम आणि सज्ज असल्याचा विश्वास व्यक्त केला जात असून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी विविध विभागांमध्ये समन्वय वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

Selected

## यावल बसस्थानकात महिलेचे दागिने चोरी

यावल । प्रतिनिधी : यावल शहरातील बसस्थानक परिसरात प्रवासासाठी आलेल्या एका महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिने आणि रोकड असा सुमारे ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे बसस्थानक परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हाफिज खान अब्बास खान (वय ४९), त्यांची पत्नी फरजाना बी आणि मुलगी सदफ परविन, रा. ताहा नगर, फैजपूर हे रविवारी यावल बसस्थानकात प्रवासासाठी आले होते. बसस्थानकातील कंट्रोल कॅबिनजवळ ते बसलेले असताना अज्ञात चोरट्याने संधी साधून फरजाना बी यांच्या पर्समधील सोन्याचा हार आणि पाच हजार रुपयांची रोकड असा एकूण ६५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. काही वेळानंतर पर्स तपासली असता चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर त्यांनी तातडीने यावल पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

# बकरी ईदपूर्वी धुळे शहरात पोलिसांचा रूट मार्च!

## संवेदनशील भागांत वाढवला बंदोबस्त; शांतता राखण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** आगामी बकरी ईद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर धुळे जिल्हा पोलीस प्रशासनाने शहरात शांतता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कडक तयारी सुरू केली आहे. या अनुषंगाने मंगळवारी सायंकाळी धुळे शहरातील संवेदनशील आणि हिंदू-मुस्लिम मिश्रवस्ती भागांत पोलिसांच्या वतीने भव्य पथसंचलन अर्थात रूट मार्च काढण्यात आला. या पथसंचलनामुळे शहरात सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात आल्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचला. धुळे जिल्ह्यात २८ मे २०२६ रोजी मुस्लिम बांधवांचा बकरी ईद उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच सामाजिक सलोखा कायम राहावा यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी




६ ते ७ या वेळेत हे पथसंचलन पार पडले. शहरातील अरिहंत मंगल कार्यालय, गजानन कॉलनी पोलीस चौकी, भोईवाडा, वडजाई रोड, भोला बाजार, मच्छीबाजार, महादेवपुरा, मौलवीगंज, घड्याळवाली मशिद ते बारा पत्थर या परिसरातून पोलिसांनी संचलन केले. या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते तसेच काही भाग संवेदनशील म्हणून ओळखले जात असल्याने पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले. या रूट मार्चमध्ये अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, धुळे शहर उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे, स्थानिक गुन्हे शाखा, जिल्हा विशेष शाखा, शहर वाहतूक शाखा, पोलीस मुख्यालयातील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच धुळे शहर, आझादनगर, देवपूर, पश्चिम देवपूर, मोहाडीनगर आणि चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यांतील अधिकारी, कर्मचारी, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ६ चे जवान आणि होमगार्ड यांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पोलिसांनी नागरिकांना बकरी ईद उत्सव शांततेत आणि बंधुभावाच्या वातावरणात साजरा करण्याचे आवाहन केले आहे. अफवांवर विश्वास न ठेवता कोणतीही संशयास्पद घटना आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. सोशल मीडियावर आक्षेपार्ह किंवा दिशाभूल करणारे संदेश पसरविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. धुळे शहरात पोलिसांच्या या रूट मार्चमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, आगामी बकरी ईद उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### सामाजिक सलोखा राहावा यासाठी खबरदारी

धुळे जिल्ह्यात २८ मे २०२६ रोजी मुस्लिम बांधवांचा बकरी ईद उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच सामाजिक सलोखा कायम राहावा यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. विशाल आनंद आणि अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी ६ ते ७ या वेळेत हे पथसंचलन पार पडले. शहरातील अरिहंत मंगल कार्यालय, गजानन कॉलनी पोलीस चौकी, भोईवाडा, वडजाई रोड, भोला बाजार, मच्छीबाजार, महादेवपुरा, मौलवीगंज, घड्याळवाली मशिद ते बारा पत्थर या परिसरातून पोलिसांनी संचलन केले.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# वर्टेक्स हिलिंग सेंटरतर्फे पदवीदान सोहळा संपन्न!

## टॅरो क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा गौरव

जन सम्राट टाईम्स

**पुणे। प्रतिनिधी :** पुणे येथे नुकताच Vertex Healing Centre तर्फे श्रेयस बँकेट येथे भव्य-दिव्य पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सकारात्मक ऊर्जा, आध्यात्मिक विकास आणि वैयक्तिक प्रगतीचा संदेश देणाऱ्या या विशेष समारंभात विविध क्षेत्रातील प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.संस्थेच्या संचालिका डॉ. मंजुषा तांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण पूर्ण केलेल्या रेकी ग्रँड मास्टर, एंजल मास्टर ट्रेनर, मनी रेकी ग्रँड मास्टर तसेच प्रोफेशनल टॅरो कार्ड रीडर्स यांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने कार्यक्रमात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे अवघ्या १७ वर्षीय शिवांश तांडेकर लिखित "The Things Teenagers




Don't Say" या पुस्तकाचे प्रकाशन होय. तरुण पिढीच्या भावना, विचार आणि मनातील न बोलल्या जाणाऱ्या भावविश्वाला स्पर्श करणाऱ्या या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते उत्साहात प्रकाशन करण्यात आले. उपस्थितांनी या पुस्तकाचे विशेष कौतुक केले. अध्यक्ष डॉ. राजन संचेती, विंभ पब्लिकेशनचे संचालक दीपक प्रभात, नागपूर येथील भारतीय मजदूर कामगार संघाचे शंकरराव पहाडे, तसेच योगराज काटबरी, शारदा काटबरी, डॉ. सुवर्णा सुर्वे आणि महेश कुमार तांडेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे आवाहन केले.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# अनुसूचित जातीचे वर्गीकरण रद्द करा!

## वंचित बहुजन आघाडी आक्रमक

जन सम्राट टाईम्स

**पारोळा प्रतिनिधी :**अनुसूचित जातींचे विशिष्ट पद्धतीने वर्गीकरण करून समाजात विभागणी करण्याचे षडयंत्र महायुती सरकारकडून सुरू असल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर पारोळा तालुका, शहर आणि युवा कार्यकारिणीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे अनुसूचित जातीतील मागासवर्गीय समाजावर अन्याय करणारे निर्णय शासनाने तात्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच सामाजिक न्याय आणि संविधानिक हक्क अबाधित ठेवण्यासाठी शासनाने संवेदनशील भूमिका घ्यावी,
अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अनुसूचित जातीतील घटकांचे वर्गीकरण करून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू असून, हा प्रकार संविधानाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे. दलित समाजाच्या हक्कांवर कुठलाही आघात सहन केला जाणार नाही. शासनाने सामाजिक समतेच्या दृष्टीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. निवेदन सादर करताना कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. आंदोलनादरम्यान परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष दयाराम



ताराचंद मोरे, युवा तालुकाध्यक्ष विजय बागुल, पारोळा शहराध्यक्ष कमलेश सोनवणे, तालुका प्रसिद्धी प्रमुख राहुल सरदार, महासचिव श्रीकांत सोनवणे, सहसचिव राजू कांबळे तसेच तालुका उपाध्यक्ष कांतीलाल करंजे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल

या निवेदनाद्वारे अनुसूचित जातीतील मागासवर्गीय समाजावर अन्याय करणारे निर्णय शासनाने तात्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच सामाजिक न्याय आणि संविधानिक हक्क अबाधित ठेवण्यासाठी शासनाने संवेदनशील भूमिका घ्यावी, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अनुसूचित जातीतील घटकांचे वर्गीकरण करून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू असून, हा प्रकार संविधानाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे. दलित समाजाच्या हक्कांवर कुठलाही आघात सहन केला जाणार नाही.

# २० महिन्यांपासून फरार असलेला खुनाचा आरोपी दोंडाईचा पोलिसांच्या जाळ्यात

## गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शेतातून अटक; शिंदखेडा पोलिसांच्या ताब्यात

जन सम्राट टाईम्स

**दोंडाईचा । प्रतिनिधी:** शिंदखेडा तालुक्यातील शेवाळे येथे २०२४ मध्ये घडलेल्या खुनाच्या गंभीर गुन्ह्यातील तब्बल २० महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला दोंडाईचा पोलिसांनी अखेर जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी सापळा रचत आरोपीला जुने कोळदे येथील एका शेतातून ताब्यात घेतले. मिळालेल्या माहितीनुसार, दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी शेवाळे (ता. शिंदखेडा, जि. धुळे) येथे दीपक रतिलाल मालचे यांच्यावर जीवघेणा हल्ला करून त्यांचा खून करण्यात आला होता.
या प्रकरणी शिंदखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २३५/२०२४ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०३(१), ३(५) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी मुकेश सुरेश मोरे (भिल) हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता.




पोलिसांकडून त्याचा सातत्याने शोध सुरू होता. दरम्यान, दि. २५ मे २०२६ रोजी दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे यांना आरोपी जुने कोळदे येथे येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक इमरान शेख यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. पोलिसांनी गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाचा वापर करत आरोपीचा माग काढला आणि जुने कोळदे येथील एका शेतातून त्याला ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव मुकेश सुरेश मोरे (भिल), वय २३, रा. शेवाळे ता. शिंदखेडा जि. धुळे असे आहे. आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी शिंदखेडा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई धुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे तसेच शिरपूर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत दोंडाईचा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे, पोउनि इमरान शेख, पोलीस अंमलदार हिरालाल सूर्यवंशी, प्रविण निकुंभे, निलेश हालोरे, निलेश धनगर, हर्षल सोनवणे, राकेश रोकडे, अमोल पाटील तसेच होमगार्ड अमिन शहा यांनी सहभाग घेतला.

# NEET पेपरफुटीप्रकरणी दोषींवर कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या NEET UG 2026 परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि गैरव्यवहार प्रकरणी महाराष्ट्र प्रोफेशनल टीचर्स असोसिएशनने तीव्र संताप व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. या संदर्भात संघटनेच्या धुळे शाखेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, देशभरातील तब्बल २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या NEET परीक्षेत झालेल्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले आहे. पेपरफुटीप्रकरणी संबंधित रॅकेट, भ्रष्ट अधिकारी तसेच दोषी आढळणाऱ्या खाजगी क्लासेस चालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. संघटनेने स्पष्ट केले की, "प्रोफेशनल टीचर्स असोसिएशन" ही संघटना गेल्या २६ वर्षांपासून प्रामाणिक आणि सर्वसामान्य क्लास चालकांच्या हितासाठी कार्यरत आहे. तसेच या प्रकरणातील गुन्हेगारांवर जलदगतीने खटले




चालवण्यासाठी स्वतंत्र फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याची मागणी संघटनेने केली आहे. NEET सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये होणाऱ्या पेपरफुटींना आळा घालण्यासाठी परीक्षा पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ऑनलाइन परीक्षा पद्धती, कडक सुरक्षा यंत्रणा, NTA च्या कारभारात पारदर्शकता तसेच परीक्षा विविध सत्रांमध्ये घेण्याची मागणी संघटनेने केली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पुढील वर्षापासून NEET परीक्षा संगणकाधारित (ऑनलाइन) पद्धतीने घेण्याची केलेली घोषणा स्वागतार्ह असल्याचेही संघटनेने म्हटले आहे. JEE प्रमाणे वर्षातून दोन वेळा NEET परीक्षा घेऊन विविध स्लॉटमध्ये परीक्षा आयोजित कराव्यात आणि गुणांच्या सामान्यीकरणासाठी Percentile पद्धतीचा वापर करावा, अशी सूचनाही करण्यात आली आहे.

# पाळधीत अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचा शुभारंभ

## महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या उपस्थितीने भक्तिभावाचे पर्व-जय्यत तयारी

जन सम्राट टाईम्स

**पाळधी /धरणगाव /जळगाव | प्रतिनिधी:** राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त पाळधी नगरीत आजपासून भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माच्या पवित्र उत्सवाने भारावून जाणार असून अखंड हरिनाम सप्ताहाला आज प्रारंभ होत आहे. या निमित्ताने संपूर्ण पाळधीसह पंचक्रोशी परिसरात भक्तीचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सप्ताहाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील अत्यंत नामवंत, अभ्यासू आणि आपल्या प्रभावी वाणीने लाखो भाविकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे कीर्तनकार या सप्ताहात सहभागी होत आहेत. संत परंपरेतील विचार, अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या पवित्र धार्मिक सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे



पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे सुपुत्र, विद्यमान जिल्हा परिषद सदस्य व युवा नेते प्रतापराव पाटील यांच्या हस्ते विधिवत पूजा करून मंडप उभारणी व इतर कामांचा शुभारंभ करण्यात आला. युवा नेते प्रतापराव पाटील व विक्रम पाटील समस्त पाटील परिवार तसेच सर्व ग्रामस्थ व भक्तगण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे नियोजन व आयोजन करण्यात आले असून, आयोजक समिती आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. भाविकांच्या मते संकीर्तन सप्ताह हा संत विचारांच्या रुजवातीचे आणि संस्कारांचे प्रभावी माध्यम आहे.
हरिनामाचा गजर जिथे घुमतो, तिथे मनाला शांती लाभते; संत विचारांच्या प्रकाशात, जीवनाला नवी दिशा मिळते...

- दि. २७ मे २०२६ (बुधवार) : श्री. ह.भ.प. रामायणाचार्य रामेश्वर महाराज, पाळधीकर
- दि. २८ मे २०२६ (गुरुवार) : श्री. ह.भ.प. बालकीर्तनकार ज्ञानेश्वरजी महाराज, जाऊरकर
- दि. २९ मे २०२६ (शुक्रवार) : श्री. ह.भ.प. गुरुवर्य स्वामी अमृताश्रमजी महाराज जोशी, विडकर
- दि. ३० मे २०२६ (शनिवार) : ह.भ.प. भागवताचार्य सोनाली देवी कर्पे, चक्रवेदकर
- दि. ३१ मे २०२६ (रविवार – पौर्णिमा विशेष) : श्री. ह.भ.प. धर्मभूषण संग्रामजी बापू महाराज, भंडारे, आळंदीकर
- दि. ०१ जून २०२६ (सोमवार) : श्री. ह.भ.प. युवाचार्य संतोषजी महाराज, आठवणे समर्पण आश्रम, कुंभारी
- दि. ०२ जून २०२६ (मंगळवार) : श्री. ह.भ.प. कीर्तनकेसरी अक्रूरजी महाराज, साखरे, गेवराईकर
- दि. ०३ जून २०२६ (बुधवार – काल्याचे कीर्तन) : श्री. ह.भ.प. गौ. प्रेमी गजाननजी महाराज, वरसाडेकर

दैनिक कार्यक्रम सकाळी ५ ते ६ काकडा आरती • सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ • रात्री ८ ते १० कीर्तन कार्यक्रम
या सात दिवसीय आध्यात्मिक पर्वाचा लाभ घेण्यासाठी सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# समता सैनिक दलाचे शतक महोत्सवी राज्यस्तरीय अधिवेशन 31 मे रोजी ठाण्यात

## "ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार व्हा"; राज्यभरातील आंबेडकरवादी नागरिकांना उपस्थितीचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**ठाणे। प्रतिनिधी :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाच्या स्थापनेला यंदा १०० वर्षे पूर्ण होत असून, या शतक महोत्सवी वर्षानिमित्त ३१ मे २०२६ रोजी ठाणे येथे राज्यस्तरीय भव्य अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनास राज्यभरातील समता सैनिक, आंबेडकरवादी विचारांचे अनुयायी, मानवतावादी आणि लोकशाहीवादी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समता सैनिक दलाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष धर्मभूषण बागुल यांनी केले आहे. समता सैनिक दल ही सामाजिक न्याय, समता आणि संविधान रक्षणासाठी कार्य करणारी ऐतिहासिक संघटना असून, अनेक दशकांपासून संघटना निष्क्रिय अवस्थेत गेल्याचे चित्र होते. मात्र गेल्या चार ते पाच वर्षांत समता सैनिक दलाने नव्या उमेदीने राज्यभरात पुन्हा संघटनात्मक बांधणी सुरू केली आहे. आज राज्यातील तब्बल २५ जिल्ह्यांमध्ये संघटना सक्रियपणे कार्यरत असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. धर्मभूषण बागुल यांनी सांगितले की, "बाबासाहेबांचे उपकार मानणारा प्रत्येक व्यक्ती त्यांच्या




विचारांच्या संघटनेशी जोडला गेला पाहिजे. सामाजिक परिवर्तनासाठी आणि संविधानाच्या रक्षणासाठी समता सैनिक दल मजबूत होणे ही काळाची गरज आहे." १३ मार्च २०२६ रोजी समता सैनिक दलाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात येणारे हे अधिवेशन राज्यातील आंबेडकरवादी चळवळीसाठी ऐतिहासिक ठरणार असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले आहे. या अधिवेशनात सामाजिक, शैक्षणिक आणि संघटनात्मक विषयांवर चर्चा होणार असून राज्यभरातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित सामाजिक बांधिलकी मजबूत करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त केला जाणार आहे. दरम्यान, राज्य कार्यकारिणीच्या वतीने सर्व नागरिकांना कुटुंबासह व मित्रपरिवारासह या अधिवेशनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून, "ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार व्हा" असा संदेश देण्यात आला आहे.

### राज्यभरात पुन्हा संघटनात्मक बांधणी सुरू

या अधिवेशनास राज्यभरातील समता सैनिक, आंबेडकरवादी विचारांचे अनुयायी, मानवतावादी आणि लोकशाहीवादी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समता सैनिक दलाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष धर्मभूषण बागुल यांनी केले आहे. समता सैनिक दल ही सामाजिक न्याय, समता आणि संविधान रक्षणासाठी कार्य करणारी ऐतिहासिक संघटना असून, अनेक दशकांपासून संघटना निष्क्रिय अवस्थेत गेल्याचे चित्र होते. मात्र गेल्या चार ते पाच वर्षांत समता सैनिक दलाने नव्या उमेदीने राज्यभरात पुन्हा संघटनात्मक बांधणी सुरू केली आहे.

# "महाकवी दुःखाचा" कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

जन सम्राट टाईम्स

**ठाणे | प्रतिनिधी :** साहित्य भारती, ठाणे यांच्या वतीने आयोजित ज्येष्ठ अभ्यासक आणि वक्ते सतीश सोळांकूरकर यांच्या "महाकवी दुःखाचा" या विशेष साहित्यिक कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कवी ग्रेस यांच्या कविता, आठवणी आणि त्यांच्या संवेदनशील साहित्यविश्वाचा वेध घेणारा हा कार्यक्रम नुकताच श्रीराम व्यायामशाळा संस्था येथे उत्साहात पार पडला. कवी ग्रेस यांच्या कवितांमधील सूचकता, गूढ प्रतिमासृष्टी, रूपके आणि गर्भित अर्थ सतीश सोळांकूरकर यांनी ओघवत्या आणि विद्वत्तापूर्ण शैलीत उलगडून सांगितले. त्यामुळे ग्रेस यांच्या कविता केवळ ऐकण्यापुरत्या मर्यादित न राहता नव्या जाणिवांसह अनुभवण्याची संधी रसिकांना मिळाली.
कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अशोक बागवे, नरेंद्र पाठक, मिलिंद बल्लाळ यांच्यासह नितीन केळकर, संदेश ढगे, कांताराम सोनावणे, सुधीर चित्ते, मंगेश सातपुते, रामदास खरे, अंजुशा पाटील, जनार्दन म्हात्रे, कल्पना पाटकर, विद्या बनसोडे, विकास भावे, साधना ठाकूर, संध्या लगड, निकिता भागवत, शिवानी गोखले, श्रीनिवास नार्वेकर आदी मान्यवर तसेच विविध क्षेत्रांतील साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.